# महाराष्ट्र शासन

क्रमांक:टिपीएस-१७९५/२५७/प्र.क्र.३९/९५/नवि-१२
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक: २७ / ११/२००५

प्रति,

मुख्याधिकारी,
माथेरान नगरपरिषद,
माथेरान जिल्हा रायगड.

विषय:- माथेरान गिरिस्थानाच्या मंजुर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) प्रमाणे बदल करणेबाबत..

संदर्भ:- १) शासनाचे समक्रमांकाचे दि. २४ जुलै, १९९५ चे पत्र..
२) माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे दि. ३१.५.१९९९ चे पत्र क्र.एमएल/१९०/९८-२०००

कृपया संदर्भाधिन पत्रांचे अवलोकन व्हावे. संदर्भाधीन पत्र क्र. १ अन्वये शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत कळवले होते. त्यास अनुसरुन माथेरान नगरपरिषदेने दि. ३१.५.१९९९ चे पत्रान्वये फेरबदल प्रस्ताव शासनास सादर केलेला होता.

केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने माथेरान व सभोवतालचा प्रदेश पर्यावरण दृष्टया संवेदनशील म्हणुन जाहीर केलेला आहे त्यानुसार प्रथमत: संपुर्ण पर्यावरणदृष्टया संवेदनशील क्षेत्राचा Zonal Master Plan तसेच नगरपरिषद हद्दीमधील क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. प्रस्तुत कलम ३७ च्या प्रस्तावामुळे मंजुर विकास योजनेमध्ये अमुलाग्र बदल होत असलेने व वरील वस्तुस्थिती विचारात घेता माथेरान नगरपरिषदेने सादर केलेला कलम ३७ चा प्रस्ताव नामंजुर करणेत येत आहे. असे कळवणेचे मला आदेश आहेत.

(न. र. राणे)
कक्ष अधिकारी

३३५०
२७११०५

प्रत,

१) मा. संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) मा. महानगर आयुक्त, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा.
३) मा. उपसंचालक नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
४) सहायक संचालक नगर रचना, अलिबाग शाखा, अलिबाग निर्धार टिळक चौक, अलिबाग जिल्हा रायगड.

श्री पोटकर, रचनार